# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १३/०७/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :— दिनांक ११/०७/२०२२ चे ११.०० वा. ते ११.३० वा. दरम्यान वय ३८ वर्ष फिर्यादी/पीडित यांच्या कंपाउंडरवाल चे पाणी जमा होत असल्याने कंपाउडला लागुन जाळी प्लेट लावली होती. दि ०६/०७/२०२२ रोजी फिर्यादी ही तिचे पतीसोबत गावी गेली व घरी परत अली असता शुभम कोरडे याला म्हटले की, 'नाली का बुजवली' असे म्हटले असता आरोपी नामे— निलेश कोरडे रा. जयपुर सातगाव ता जि नागपुर याने 'तुला जे करायचे आहे ते करून घे' असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ केली तसेच आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनी श्री भोयर मो.क्र. ९९२३१११२७० हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत मौजा पोतदार हॉस्पीटल च्या समोर कळमेश्वर येथे दिनांक २४/०६/२०२२ चे १२.०० वा. सुमारास **प्रभाकर कृष्णराव व्यवहारे (मृतक), वय ७५ वर्ष रा.गांधीचौक विठ्ठल वार्ड मोहपा** हे पुतण्याचे ॲडमिशन करण्याकरिता त्यांचे मित्राचे मोटरसायकलवर बसुन त्यांचे पुतण्या सोहम दिलीप व्यवहारे व मंदार दिलीप व्यव्हारे यांना मोटरसायकलवर बसवुन मोहपा येथुन कळमेश्वर ला जात होते. त्यादरम्यान त्यांची मोटरसायकल स्लिप झाल्याने तिघेही मोटरसायकल सह जमिनीवर खाली पडले. त्यामध्ये सोहम व्यवहारेला किरकोळ मार लागला व प्रभाकर व्यवहारे यांच्या डोक्याला मार लागल्याने त्यांना जवळचे पोतदार हॉस्पीटल कळमेश्वर येथे प्रथमोपचार करून त्यांनी त्यांना नागपूरला रेफर केल्याने त्यांचा उपचार आशा हॉस्पीटल नागपूर येथे नेले असता दिनांक ३०/०६/२०२२ चे १२.२४ वा. तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सरतर्फे महिला पोलिस हवालदार नलिनी उईके पो.स्टे. कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूडे ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

२) पो.स्टे. खापा :— अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा ढकरा शिवार येथे **हरीचंद्र धनराज बारमाटे (मृतक), वय ५५ वर्ष रा करभांड ता पारशिवनी** हा दारू पिण्याचा स्वयीचा होता. दि ०८/०७/२०२२ रोजी आपले घरून निघुन गेला होता. दिनांक १२/०७/२०२२ चे १०.३० वा. सुमारास सदर मृतक हा ढकारा शिवारात दारूचे नशेत नाल्याचे काठावर मृत अवस्थेत पडुन मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अजय हरीचंद्र बारमाटे, वय २९ वर्ष रा. करभांड ता पारशिवनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार गंगाधर ठाकरे ९९२३९०८३८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर